NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक ०६.११.२०२६ शुक्रवार

१) मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते ''७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन–दिक्षाभुमी नागपुर'' बंदोबस्त उत्कृष्टरित्या पार पाडणारे पोलीस अधिकारी, अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र देऊ गौरव :–

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत ''७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन–दिक्षाभुमी नागपुर'' येथे दिनांक १८ ते २१ ऑक्टोंबर २०२६ दरम्यान, बंदोबस्तामध्ये उत्कृष्ट व उल्लेखनिय कामगिरी बजावणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दिनांक ०५.११.२०२६ रोजी पोलीस भवन येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव केला.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दिक्षाभुमी नागपुर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्थिकलश दर्शनाकरीता देशभरातुन त्यांचे अनुयायी लाखोंच्या संख्येने येत असतात. या भव्य सोहळ्यादरम्यान, मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे नियोजनबध्द मार्गदर्शनाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, वाहतुक व्यवस्थेचे नियोजन करणे, अनुयायी व भाविकांच्या तसेच, दिक्षाभुमी वास्तुचे सुरक्षिततेची काळजी घेणे अशी महत्त्वपुर्ण जबाबदारी नागपूर शहर पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांनी बंदोबस्तादरम्यान पार पाडली. करीता मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी बंदोबस्तादरम्यान समयसुचक राहुन उल्लेखनिय, उत्कृष्ट कामगिरी करुन पोलीस दलाची प्रतिमा उंचावल्याची दखल घेत कामगिरी बजावणारे बंदोबस्तातील एकुण २८ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना स्व:हस्ते प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.






(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक ०५.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०४ ईसमावर कारवाई करून एकुण ४,२६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, जुगार कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून एकुण १२,१८०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे, रात्रगस्तीमध्ये दिनांक ०५.११.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०६.११. २०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, कलम १३५ म.पो.का. संशयीत १० इसमांवर कारवाई करण्यात आली.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये २७ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ५७ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ६३ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २११ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये १०२ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २८ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०९ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये १५४ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०१ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये १३ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये ०५ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये ९२४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४(सि) अन्वये १० केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १० केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७६२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ३,३७,७००/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) परिमंडळ क्र. ५ अंतर्गत कुख्यात ०३ गुंड हद्दपार :–

परिमंडळ क्र. ५ अंतर्गत पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमणा व वाठोडा हद्दीतील **गुन्हेगार इसम नामे १) शेख आदील वल्द शेख करीम, वय ४२ वर्षे, रा. म्हॉडा क्वॉर्टर क्र. ३८/१, आजरी–माजरी, यशोधरानगर, नागपूर, २) लक्की प्रल्हाद हरणखेडे, वय २० वर्षे, रा. आजरी–माजरी, निलेश किराणा स्टोअर्स मागे, कळमणा, नागपूर ३) मंगल रमेश श्रीवास्तव, वय २६ वर्षे, रा. नवनीतनगर, रोशनबाग, खरबी, वाठोडा, नागपूर** यांचेविरूध्द पोलीस ठाणे यशोधरानगर, कळमणा व वाठोडा येथे दमदाटी व मारपीट करणे, जाणीवपुर्व दुखापत, मारहाण करणे, दरोडा टाकण्याचे उद्येशाने एकत्र जमुन तयारी करणे, अवैधरित्या हत्यार बाळगणे, अंमली पदार्थांबाबत गुन्हे करणे, सार्वजनिक ठिकाणी अश्लिल कृत्य करणे, अश्लिल गाणी व अपशब्द वापरुन इतरांना त्रास देणे, समान उद्येशाने जमाव करणे, खुनाचा प्रयत्न, जिवे मारण्याची धमकी देऊन हमला करणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्यांचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता यशोधरानगर, कळमणा व वाठोडा पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. अनुक्रमे १) ०९/२०२६ दिनांक २६.१०.२०२६ २) १०/२०२६ दिनांक २६.१०.२०२६ ३) ११/२०२६ दिनांक २८.१०.२०२६ अन्वये गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून अनुक्रमे सहा महिने, सहा महिने व तीन

महिनेकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे. नमुद हद्यपार आदेशाची अंमलबजावणी यशोधरानगर, कळमणा व वाठोडा पोलीसांनी दिनांक २६ व २८.१०.२०२६ रोजी केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यांनद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. श्री. युनुसचांद शेख, श्री. प्रविण काळे व श्री. प्रमोद पोरे व त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

३) **एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :– प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्रीकरीता साठवणुक करणाऱ्या ईसमाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०५.११.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, प्लॉट क्र. १६,१७, न्यु ओम साई नगर, जुना कामठी रोड, कळमणा येथे राहणारा लखन छाडी नावाचे इसमाने त्याचे राहते घरी प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ विक्रीकरीता साठा करुन ठेवला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी रेड कारवाई केली असता, तेथे एक इसम मिळुन आला. ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव लखन चतरो छाडी वय ३५ वर्षे, रा. घटनास्थळी असे सांगीतले. त्याचे घराची पंचासमक्ष पाहणी केली असता, बेडरुम व स्टोअर रुममध्ये शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्य पदार्थ वेगवेगळ्या कंपनीचे गुटखा व सुगंधीत पानमसाला असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन नमुद मुद्येमाल एकुण २,२३,५०३/–रू. चा जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थाचा साठा करुन बेकायदेशीर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द अन्न व औषध प्रशासन अधिकारी श्रीमती रविना बबन नागले, सह आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, नागपूर यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव कळमणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात, पोउपनि. अभिषेक बागडे, पोहवा. नंदकिशोर द्रवे, पोअं. शिरीष रामटेके, जोगेश्वर ठाकरे, मपोअं. प्रिती शुक्ला व चापोअं. अक्षय खोब्रागडे यांनी केली.



(गुन्हे)

१) पोलीस ठाणे इमामवाडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०५.११.२०२६ चे २२.४५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे शुभम सागर रंगारी, वय २८ वर्षे, रा. निर्मल बोरकर यांचे घरी किरायाने, कामगार भवन मागे, रामबाग, इमामवाडा, नागपूर हे पोलीस ठाणे

इमामवाडा हद्दीत, बैद्यनाथ चौक येथे सिग्नलजवळ पायदळ रस्ता ओलांडत असता, खुराना ट्रॅव्हल्स बस क्र. एम.एच ४० सी.टी ८०३८ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅव्हल्सबस भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन, पायी जाणाऱ्या फिर्यादीचे भावास धडक देवुन, घटनास्थळावरून पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचा भाऊ गंभीर जखमी झाल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी हसीन सागर रंगारी, वय ३८ वर्षे, रा. निर्मल बोरकर यांचे घरी किरायाने, कामगार भवन मागे, रामबाग, इमामवाडा, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे ट्रॅव्हल्स बस चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक ०४.११.२०२६ चे १२.३० वा. ते दिनांक ०५.११.२०२६ चे २१.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. ७४, न्यु अमर नगर, लक्ष्मी अपार्टमेंट जवळ, हुडकेश्वर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी शत्रुघ्नकुमार धनंजयकुमार, वय ४१ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मैहर येथे देवदर्शनाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील रोख ५०,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने, असा एकुण किंमती १,७५,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सफौ. माधव शिरसाम यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(मिसींग)

पोलीस ठाणे पाचपावली:– फिर्यादी श्रीमती माया विक्रम समुद्रे, वय ४२ वर्षे, रा. वैशाली नगर घाट जवळ, आजाद बुनकर कॉलनी, आंबेडकर वार्ड, पाचपावली, नागपूर यांनी पोलीस ठाणे पाचपावली येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे कु. माही विक्रम समुद्रे, वय २० वर्षे ही दिनांक २४.१०.२०२६ चे १९.३० वा. रोजी राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. ती घरी परत न आल्याने, तिचा शोध घेतला असता, मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन–** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ६ इंच, डोळे–काळे, केस–काळे व लांब, अंगात– काळा सलवार सुट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



कु. माही

(ईतर)

१) गिट्टीखदान पोलीसांचे नागरिकांना आवाहन :–

दिनांक २५.१०.२०२६ रोजी २०.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, एलएडी चौक, गौरखेडे कॉम्प्लेक्स टर्निंगजवळ दोन मोटार सायकलींमध्ये अपघात झाला होता. अपघात करणारे मोटार

सायकलस्वार घटनास्थळावरुन त्यांचे मोटारसायकलींसह पळुन गेले होते. नमुद अपघात संदर्भात पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अप.क्र. ८३०/२०२६ कलम २८१,१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं. सहकलम १३४,१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन, पुढील तपास सपोनि. श्री. विजय भिसे, पोलीस ठाणे गिट्टीखदान हे करीत आहेत.

गिट्टीखदान पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद अपघात कोणासमक्ष झाला असल्यास वा कोणी पाहिला असल्यास, अपघाताबाबत किंवा अपघात करणारे मोटार सायकल स्वारांबाबत त्याचप्रमाणे वाहनांबाबत कोणतीही माहिती असल्यास, पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे समक्ष येवुन अथवा संपर्क क्र. ०७१२—२५८०१२७ / वपोनि. सारंग मिराशी—९९२३१११३९९ / सपोनि. विजय भिसे— ७५०६८५५९९८ यांचेशी नमुद भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधुन माहिती द्यावी. माहीती देणाऱ्यांचे नांव गोपनिय राखले जाणार.

२) आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. अति. सत्र न्यायाधीश, कोर्ट रुम क्र. ११६, नागपुर.	३०५०३१३/ २०००	कलम ४५७, ३८०, ३८१, २०१ भा.दं. वि.	१) फैयाज शेख इसराईल शेख, रा. विनोबा भावे नगर, मोठ्या विहीरीजवळ, कळमणा, नागपुर. २) संतोष धरमदास वर्मा, रा. राजीव गांधी नगर, बाबुलाल बैसरेच्या घराजवळ, कळमणा, नागपूर. ३) नईम खान असगर हुसेन, रा. राजीव गांधी नगर, अहमद भाईचे घराजवळ, कळमणा, नागपूर.	१७.११.२०२६

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.